मराठी

नं. ८

स्नान-पूजा

पूजा

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ८/८ (१७५)

ग्रंथ नाम संगीत सत्यनारायण.

विषय म० या० ग्रंथ.

पूजा

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

# श्री.

# संगीतसत्यनारायण.

हे पुस्तक

वे॰ शा॰ सं॰ वामन गोकर्णनाथशास्त्री.

केमकर व गोविंदसिद्धेश्वर वासगा

वकर यांणीं रचून

संशोधून.

पुणें.


दत्तप्रसारक छापखान्यांत छापू

नप्रसिद्ध केले.

मी॰ ज्येष्ठ शुद्ध १० शके १८०६. किं॰ ०६४

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रुजुयतां पुस्तककारा

नीं आपला हक्क राखिला आहे



" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

# प्रस्तावना.

## संगीतसत्यनारायण.

वरील पुस्तक रचण्याचें मनांत येण्यास दोन कारणें झालीं. एक आलीकडे संगीत प्रयोगावर बहुतेक लोकांची अभिरुचि वाढत चालली आहे हें, आणि दुसरें ‘नृत्यगीतादिकं चरेत्’ या स्कंदपुराणगत सत्यनारायण व्रतकथेंतील वचनावरून मनांत आलेलें संगीताचें आवश्यकत्व. या दोन कारणांवरून श्रीसत्यनारायण व्रताख्यान संगीतांत रचावें असें वे. शा. सं. गोविंदाचार्य तासगांवकर यांचे मनांत येऊन त्यांणीं आम्हांस कळविल्या नंतर आम्ही त्यांस मदत करण्याचें कबूल केलें व त्या प्रमाणें त्यांणीं केलेला भाग शोधून बाकी बराच भाग स्वतां रचिला आहे. यांत स्कंदपुराणाधारें व्रतकथा सर्वांस समजावी अशा उद्देशानें सुबोध शब्दांनीं व प्रसिद्ध वृत्तांनीं रचिली आहे. यांत शब्दशः भाषांतर केल्यानें ग्रंथ वाढून कंटाळवाणी होईल यामुळें कथाऽनुसंधान सूटूं न देतां संक्षिप्त रचना केली आहे. यास लोकांचा उदार आश्रय मिळून ही आवृत्ति खपली म्हणजे यांत बरीच सुधारणा करुन दुसरी आवृत्ति छापण्याचा आमचा विचार आहे तर रसिक लोक आपला आश्रय देण्यास आळस करणार नाहींत- अशी आमची त्यास सविनय सूचना आहे.

वामन एकनाथ शास्त्री केमकर.

श्रीगजानन.

# अथ संगीत सत्यनारायणप्रा॰

## प्रहर्षिणी वृत्त.

सूतासी मुनिवर शौनकादि सारे॥ प्रश्नातें करिति
सुनैमिषीं विचारें॥ सांगे या व्रत तपकीं असोनि
सोपें॥ सर्वेच्छा पुरवि हरी अशेष पापें॥ १॥

## आर्या.

तैं सूत म्हणे परिसा व्रतवर जें श्रीशा नारदातें हो॥
सांगे गुप्त तुम्हांतें सुगमहि भवजलधि पारदातें हो
॥२॥

पद (वाहवा गुरु याचा॰)

श्रीनारद मुनि मानवभुवनीं येऊनि मनुज विलो-
कीं हो॥ कर्मार्जित बहु दुःख भरार्दित बुडति सदा
जे शोकीं हो॥ श्री॰॥ करुनि उपाया असुखें विल-
या पाठवुं सकळ जनांचें हो॥ यापरि चिंतुनि ह
रिसदनाची धरि तो वाट सुखाची हो॥१॥ श्री॰॥
श्रीहरि भजनीं प्रेम जलाप्लुत होऊनि हरिस्पदिं पावे
हो॥ नारायणसितकांति चतुर्भुज पाहुनि लग
बग धांवे हो॥ २॥ श्रीनारद॰॥ जलज सुदर्शन-
गदापद्म वनमाला भूषितकाया हो॥ वंदुनि सु
रमुनि नया मुकुंदा आरंभी स्तवनाया हो॥ ३॥

Print property of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पद. (रा. कांबोज)

नमो वाङ्मनातीत रूपा अनंता ॥ गुणरहित असुनि तूं गुणनियंता ॥ ध्रु० ॥ ॥ आदि ना-मध्य तुज अंत ही अच्युता ॥ श्रीयुता सर्व भू-तादिमूला ॥ प्रणतसंतापहा भक्तदुरितापहा ॥ चरणिं नत हा पहा नित्य भूता ॥ १ ॥ नमो० ॥ ४ ॥

साकी.

यापरि परिसुनि सुरमुनिरचितस्तवना श्रीहरि बोले ॥ वत्सा काय म्हणुनि मुनिंसदनीं वदवाये-णें केलें ॥ ५ ॥

दिंडी.

वंदे नारद जन सर्व मृत्युलोकीं ॥ विविध योनिंत पचतात दुःखपंकीं ॥ लघूपायें त्या विलय कसा देवा ॥ कृपानिलया मज वदा वासुदेवा ॥ ६
विष्णु बोले मुनिवर्य द्रुहिण बाला ॥ लोककल्याणा प्रश्न बरा केला ॥ म्हणुनि त्याच्या उपशमन शोकमोहा ॥ वदू गुप्तव्रत खुलुनि तुझ्या स्नेहा ॥ ७

पद.

श्रीनारायण व्रत हे दुर्लभ करिजरि मानव

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

भावें ॥ दुःखरहित भवमुक्त सुखान्वित-
होउनि निज पद पावे ॥ ध्रु० ॥ ॥ धनधान्य
प्रद अति प्रवर्धन संतति सौभाग्याचें ॥ नि-
शा मुखीं हें करितां विजयश्रीकर सत्वर सा
चें ॥ १ ॥ श्रीनारायण० ॥ द्विजवर बांधव स-
हित धर्मपर श्रद्धान्वित हृदयानें ॥ सत्यार्च
न उपचारीं मनुजें करिजे उचितविधानें ॥ २ ॥
श्रीनारायण० ॥ ८ ॥ ॥ ॥

श्लोक.

गोधूमचूर्ण कदलीफल शर्कराही ॥ तैसेंचि
दुग्ध घृत सर्व सपाद पाहीं ॥ एकत्र संस्कृत
करूनि निवेदिजे तो ॥ नारायणा प्रिय बहू उ-
पचार होतो ॥ ९ ॥ ॥ ॥

ओवी.

ब्राम्हणां देउनी दक्षिणा ॥ मग कीजे कथाश्र
वणा ॥ करूनि प्रसाद भक्षणा ॥ विप्रां भोज-
न मग दीजे ॥ १० ॥ नृत्यगीतादिकीं आनंद ॥
करूनिया मगस्वच्छंद, एहीं यावें सत्यपद-
द्वंद्व ॥ चित्तामाजी चिंतुनियां ॥ ११ ॥ ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्लोक. (शुद्धकामदा)

हरि म्हणे सदा परिस नारदा॥ पुरविवांछि-
ता हरुनि आपदा॥ सकल सुव्रतीं प्रवर
हें पहा॥ कलियुगीं असे सुलभ यत्न हा॥१२

इतिश्रीसंगीतसत्यनारायणे प्रथमोंशः १॥

अथद्वितीयः

पद.

श्रीनारायण तये प्रसंगीं वर्णिति सुरस क
थेला॥ ध्रु०॥ ॥निरुपम काशी-क्षेत्रीं ब्राम्ह
ण निर्धन सत्व न ज्याला॥ क्षुधा-तृषा-कु-
ल होउनि दुःखित करी सदा भ्रमणाला॥
॥१॥ श्री नारायण०॥ वृद्ध वयस्कर विप्र हो-
उनि, करि हरि त्यासी प्रश्न॥ भ्रमसे भूसु
र किमर्थ म वचनिं, होउनि विकल प्राण॥२॥
श्री नारायण०॥ सांगसि मजला तूं जरि मग
मी वारिन तव भय शोका॥ ऐकुनि ऐसें द्वि
ज तें बोले सदा हि दुर्भग मज कां॥३॥ श्री
नारायण०॥ ब्रम्हन् यांतुनि मुक्त करीमजसां
गुनि सुगम उपाया॥ तैं श्रीहरि हें सत्यव्रत त्या

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

उपदेशी मुनिराया॥ ४॥ श्री नारायण०॥ व्रत विधि सांगुनि गुप्त होय विभु विप्र मनीं विश्वासा॥ दृढ पावुनि गृहिं परत येइ तो चिंतुनि जगन्निवासा॥ ५॥ श्रीनारायण०॥ १॥

पद-(रागहमीर)

दृढतर विप्रमनीं निज ध्यास॥ दृढ सुखश्रुत सत्यव्रताचा जडला बहु अध्यास॥ दृढतर०॥ ध्रु०॥ ॥द्विजा रात्री नीज नये रजनीं॥ रतली मति श्री हरि भजनीं॥ उठतां नारायण स्मरुनी॥ करीन आजचि हें व्रत ऐसा हृदयीं करि हव्यास॥ दृढतर०॥ १॥ चिंतुनि कमला रमणासी॥ निघाला भिक्षाटनासी॥ मिळे बहु धन ते दिनिं त्यासी॥ घेउनि संपद पदार्थ सदनीं ये, बहुतचि हर्ष जयास॥ २॥ दृढतर०॥ मिळवुनि द्विज बांधव सारे॥ व्रत करि सविधि ससंभारें॥ तैं हरि दुर्भग परभारें॥ शमन करी धन धान्य-विपुल दे जनिं मान्यत्व तयास॥ ३॥ दृढतर०॥ २

आर्या·

सूत म्हणे हरिकथित व्रत सकलांहि हें सभास-

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

दा होतें॥ कथिलें स्मृतिमथित तुम्हां करितां
जें संपदा सदा होते॥ २॥ ॥

पद. (उद्धवा शांत० याचा०)

शौनकादि मुनिवर तेव्हां सूतासि वदती भावें॥
व्रतविस्तर तेंहुनि कोणीं केला हें सकल वदावें॥
श्रद्धाचि आम्हां श्रवणीं गमलें तुज हेंचि पुसावें॥
चा०॥ तें सूत म्हणे हो परिसा॥ तो द्विजवर हें प्रति
मासा॥ सद्भावें व्रत करि तैसा॥ प०॥ याचा रुनि-
बंधुजनासी पूजन करि सत्य पदाचें॥ १॥ सत्य-
हें सत्यदेवाचें॥ व्रत भवभय हारि जीवाचें॥ ध्रु०
ते समयीं काष्ठकेला तो येता होय गृहातें॥ काष्ठ-
भार बाहिर ठेवी, बहु तृषा विकळ करि ज्यातें॥
वंदुनी व्रतस्थ द्विजासी पुसता हृ सविनय चित्तें॥
चा०॥ हें काय करितसा भावें॥ मज सत्य प्रगट
सांगावें॥ तें द्विज म्हणि बहु रूस्वपावे॥ सांगुनि
मग फळहि व्रताचें; विधि सकल वदे मृदु वाचे
॥२॥ सत्य हें०॥ ऐकुनि तो व्रत अनुरागें चिंतीम
नि कमलानाथा॥ जळ प्रसाद सेवुनि वेगें, का
ष्ठभार घे निज माथां॥ संकल्पुनि तें व्रत आंगें ध

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

रिसत्वर पत्तनपंथा ॥ चाल ॥ तैंला धे द्विगुण धनातें ॥ घे पदार्थ येसद्नानें ॥ करि अर्चन हर्षित चित्तें ॥ देवा मनिं चिंतुनि साचें ॥ सुख पावे लोकद्वयाचें ॥ ३ ॥ सत्य हें सत्य० ॥ ४ ॥ ॥ ॥

इति श्रीसंगीतसत्यनारायणे द्वितीयः ॥ २ ॥

## अथ तृतीयः

### आर्या.

कैशी पुन्हा प्रसिद्धी झाली परिसा कथीन सत्याची ॥ जाउनि असत्य विलया होइल भेटी स्वरूपसत्याची ॥ १ ॥

### साकी.

पूर्वी नृपवर उल्कामुख या नामें असता जाला ॥ सत्यवचना विजितेंद्रिय मति दानीं धनदे विपुल द्विजाला ॥ २ ॥ नदीतटीं तो नृप हें व्रत करि तसली हि सुशीला ॥ पूजन समयीं अवचित तेथें सज्जन वणिज हि आला ॥ ३ ॥

### अभंग

पाहुनि व्रतस्थ रायातें सज्जन, बोले तैं वचन विनयानें ॥ १ ॥ काय आचरण करिता जी भूप ॥ सज्ञहें

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan

सरूप सांगा कीं जी ॥ ध्रु० ॥ श्रवणाची आस पुरवा वी आतां ॥ म्हणोनी नमिता झाला साधु ॥ २ ॥ भूप बोले ज्याच्या साम्य नसे तेजा ॥ करीतसें पूजा- त्या हरीची ॥ ३ ॥ पुत्रादि सकल प्राप्तीचा उपाय ॥ असे हा निश्चय साधुराया ॥ ४ ॥ ४ ॥ ॥

पद ( धांव० या धांव० याचा० )

सत्यदेव हा सुखद सर्वदा ॥ दीन बंधु सौख्यसिंधु वंदुनिया वदनिं नो वदा ॥ ध्रु० ॥ ॥ साधु निजगृहा येउनी सुखें ॥ स्वांगने प्रती व्रत वदे मुखें ॥ करिन संतती होय ते सखे ॥ चाल ॥ धरुनि भाव हरिनिभाव लाव म्हणे धांव पाव नांव जगीं ठेवि हरी वंध्यत्तापदा ॥ सत्य देवहा० ॥ १ ॥ नवस यापरी, करुनि माधवा ॥ दंपती सुखें रमति नेथवां ॥ हरिकृपें सती गर्भिणी धवा ॥ मुदित करी उदित कांति गर्भातस मंदगती, लीलावति शीलवती वदुनि दोहदा ॥ २ ॥ सत्य० ॥ उत्सवे दहा मास लोटला ॥ सज्ज नांगना प्रसवली सुता ॥ शशिकला जशी- तीदिसे स्वतां ॥ चाल ॥ म्हणुनि कलावती नाम ठेवुनियां तोषधाम ॥ साधुमनीं पूर्ण काम जाहला

तदा॥ ३॥ सत्यदेव हा०॥ ५॥ ॥

आर्या.

लीलावती म्हणे तैं नकरा संकल्पित व्रता कां हो॥
नारायण भजना मूल रुचि घ्या न भुलूनि विषयता-
कां हो॥ ६॥ सज्जन म्हणे सति खरें व्रत राज चिहें दु-
जें न समयास॥ परि फळ पदरिं पडो दे करिन सु-
लीच्या विवाहसमयास॥ ७॥ ॥

पद. (कोणी दाचानय० याचा०)

यावरि लग्नसमय जरि पाहे॥ सज्जन तैं निज जन-
तो वाहे॥ पाठवि दूत वरास्तव मोहें॥ चाल॥ कांच-
न नगराहुनि तो आणी, वर बहु योग्य तरुण गुण
खाणी॥ त्यासि यथाविधि साधु सुतादे॥ द्रव्याचा
करि बहु विखरा॥ १॥ हरि विसरे तो हतभाग्य ख
रा॥ जरि चढला उन्नतिच्या शिखरा॥ ध्रु०॥ व्रत-
विस्मरणें श्रीहरि कोपी॥ हो बहु दुःख, असें त्या
शापी॥ साधु परी मनिं नचि अनुतापी॥ चाल०॥ व्या
पारा मग उदित जावया, सहित निघे तो दूर जाव-
या॥ चंद्रकेतुच्या नगरिं जाउनी, करि वस्तुंचा
क्रय विक्रया॥ २॥ हरि विस०॥ एकदिनीं नृपमंदि-

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

रिंशिरला॥ तस्कर तो धनहरुनी फिरला॥ सज्जनसदनानिकटीं आला॥ चाल॥ दूत विलोकुनि भीत अंतरीं॥ जाय पळुनि धन त्यजुनि भीतरीं॥ राजदूत तें साधुसिं बांधिति, नच्चले मग त्याचा नखरा॥ ३॥ हरी०॥- नृपवित्तासह त्याउभयांतें॥ नेति सभे वदुदेति भयातें॥ ऐकुनि वृत्त नृपेंहि तयांतें॥ चा०॥ नविचारुनि निज कारागारीं॥ ठेवुनि हरिलें धन परभारीं॥ चोर लुटिति घर, वनिता दुहिता भिक्षाटनिं भरिती उदरा॥ ४॥ हरिविसरे तो० जरि चद०॥ ७॥ ८॥

ओवी.

यापरि ज्ञाला कांहीं काळ॥ कलावती सगुण वेल्हाळ॥ निशीं पीडिला क्षुधानळ॥ द्विजालयीं जायती॥ ९॥ तो द्विज करि नरसे सत्यार्चन॥ येरी पाहूनि कथा श्रवण॥ झालिया, प्रसाद भक्षण, करूनि गृहा परतली॥ १०॥ ॥ ॥

पद.

( गर० सुंदर मुख तुंदिल तनु० चा० )

सुखदायक सत्यार्चन आजि देखिलें॥ अघमल हरसकल फलद मजसि वाटलें॥ ध्रु०॥ साधुसु-

ना अति कृश तनु घेउनी घरा ॥ जननी प्रति मृदुल वदे वचन सादरा ॥ सुखकर भवजलधितरण ऐक सत्वरा ॥ आई, पाहीं, कांहीं, द्विजसदनीं, निशिवदनीं, जन जमुनी करिती चांगलें ॥ १ ॥ सुखदायक० ॥ अघमलहर सक० ॥ जननी मग परिसुनि त्या स्मरतसे व्रता ॥ हर्षान्वित आचरती होयती स्वतां ॥ पूजांतीं विनवितसे होउनी नंता, बा० ॥ पापा, तापा, शापा, शमिं सखया मज अजया पदिं सदया नेइं मागलें ॥ २ ॥ सुखदा० ॥ अघमल० ॥ जामात्या सह मम पति आत्म मंदिरा ॥ येवोंदे अक्षततनु भुवनसुंदरा ॥ प्रार्थुनियां वणिजंसती हृदयिं या वरा ॥ लागे, वेगें, ओगे, हरिचरणा, सुरशरणा, मनि सगुणा, वागवी भलें ॥ ३ ॥ सुखदायक० ॥ अघमलहर० ॥ ११ ॥

## दिंडी.

सत्यनारायण देव सदय झाला ॥ स्वप्न दावी शशिकेतु राजियाला ॥ साधु जामात्या सहित मुक्त कीजे ॥ द्रव्य देउनियां त्वरित बोळवीजे ॥ १२ ॥ म[illegible] झाहे चुकतांचि नृपा पाहे ॥ राज्य धनसुत न[illegible] ।

नसकळ बाहें ॥ असें बोलुनिया त्वरित नृपालागीं॥ गुप्त झाला प्रभु जया स्मरति योगी ॥ १३॥ चंद्रकेतुहि मग धरुनि जागृतीला ॥ वदे स्वप्नींचें वृत्त निज जनाला॥ दूतहस्तें करि मुक्त उभयतांला॥ स्नान घालुनि दे शुद्धता तयांला ॥ १४॥ वस्त्र भूषण देऊनि तोषवीलें॥ नृप वचनीं सज्जना रंजवीलें॥ म्हणे साधो तव दुःख आजि गेलें॥ पूर्वदुरितें जें तुला भोग वीलें ॥ १५॥ ॥ ॥

आर्या.

पूर्वानीत द्रविणाहि तें द्विगुणित करूनि अर्पितो सदय॥ स्वगृहीं गमन कराया नृप आज्ञा देत यामुदित हृदय॥ १६॥ साधु नृपासी नमुनी, येतो बोले दयाब्धि भज वरही॥ राही, सकल सुखोत्तर झालीं दुःखें बरींच अजवरही॥ १७॥ ॥

इतिश्रीसंगीत सत्यनारायणे तृतीयः ॥ ३॥

अथ चतुर्थः

आर्या.

देउनि धन द्विजांना, देशीं मग जावयास साधु निघे॥ सिद्ध करुनि तरणीतें, वित्तें भरि नित्य रूप्य सा धुनि-

घे ॥ १ ॥ पद (जातीच्यासंद ० याचा ०)

अघटित ही सहज लीला, घननीलाची खरी ॥ ध्रु० ॥ जाणाया सज्जनाचें मन झाला होयती ॥ प्रभु, मायाऊम्मा या अतिकठिनाहोयती ॥ येऊनी साधुपाशी, मग बोले श्रीपती ॥ चाल ॥ साधो या काय नावे ॥ माझी हें मी स्वभावें ॥ पुसतों कीं शुद्ध भावें ॥ मज सांगें सत्वरी ॥ १ ॥ अघटित० ॥ ऐकूनी भिक्षवाक्या, करि साधु हेळण ॥ हासोनी बोलताहे, त्या त्रिजगपाळणा ॥ कां पुसतां स्वामिराया, इछुनि त्या दक्षिणा ॥ चाल ॥ मत्रें ही बहुलतांची ॥ असती ही सकलसाची ॥ अनूतीकीं एकतांची ॥ मनिं हांसें श्रीहरी ॥ २ ॥ अघटित ही सहज लीला० ॥ होवो हें सत्य बापा वचन तुझें नें असे ॥ बोलूनी सत्यदेव प्रभु निकटीं जातसे ॥ साधू हा नित्यकर्मा करुनि तरी पाहतसे ॥ तें पत्रें दिसति सारीं ॥ दुःखित तो होय भारी ॥ शुद्धि न त्या निज शरीरीं ॥ मोह मना आवरी ॥ ३ ॥ अघटित ही० ॥ २ ॥ ॥

## घनाक्षरी

पडे भूवरि मग काय ॥ करी सज्जन मनिं हाय ॥ मही आपटि करपाय ॥ दीन धाय मोकली ॥ १ ॥ सज्जना-

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

चाज्ञामात ॥ वदतसे तैं ही मात ॥ नसे किमपि हि-
शेकांत ॥ करा त्वरित कृत्य हें ॥ २ ॥ वदुनि संन्या
सी शाप ॥ निकट दिसे, हरुनि पाप ॥ शमन करिल
सकल ताप ॥ मायबाप वंदिलां ॥ ३ ॥ क्रूरवद वच
न परिसतांच ॥ साधुवणिज शरण साच ॥ जाय-
नमुनि सहनतांच ॥ अनृतवचनिं भागतो ॥ ४ ॥ ३ ॥

साकी.

परिसुनि यांतवर साधुविलापा, नकरि म्हणे रुदना
ला ॥ मम अर्चन तूं तुच्छसी म्हणुनिच पावसि बहु-
दुःखाला ॥ ४ ॥

घनाक्षरी.

अशी परिसुनि तो मात ॥ भ्रला आठवे चित्तांत ॥ उ-
भा जोडुनि मग हात ॥ रमाकांत स्तवितसे ॥ १ ॥ तु-
झ्या मायेचें तीर ॥ स्फुरत न आणांति कविहीर ॥ स-
कल ब्रम्हादिक धीर ॥ मी अधीर मग कुठें ॥ २ ॥ स
दय होउनि तूं त्वरित्त ॥ सकल नाव द्रविण भरिल ॥
नयनिं दाविं करिन खचित, यथाविधि व्रत तुझें ॥ ३ ॥
वणिज बोल ऐकतांच ॥ मुदित होउनिया साच ॥
पुरवि काम नुरवि आंच ॥ स्वधामाच मग निघे ॥ ४ ॥ ५

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

श्लोक. (वसंतति०)

होतांचि गुप्त विभु, सज्जन नाव पाहे॥ येऊन तीत तव वित्त समस्त आहे॥ नारायणें मम मनोरथ पूर्ण केला॥ जाणूनि तो करि तदाचि नया व्रताला ॥६॥ होऊनि तुष्ट मग साधु पुर प्रदेशा॥ चाले स्मरूनि हृदयांत वरप्रदेशा॥ येतां पुरी निकट दावुनि जांवयाला॥ दूतासि पाठवि पुढें गृहिं जावयाला॥७॥

पद. (भलजिन्महो० याचा०)

सत्य सर्वगत सत्यदेव हा भजका संतां पिता॥ असे निज विमुखां संतापिता॥ ध्रु०॥ ॥ पतिव्रता पतिदर्शन व्हाया करितां करि या व्रता॥ तदंतीं दूत येइ अवचितां॥ बद्धांजलि तो मंजुल बोले लीलावति ऐकतां॥ सुधाधिक मधुर वचन तत्वतां॥ चाल॥ जावयासहित हा साधु निकट पत्तना॥ क्षेमरूप आला मिळवुनि बहुता धना॥ हें सत्य पहा हो शंका न धरा मना॥ प०॥ ऐकुनि यापरि दूतवचन तें साधुसती विस्मिता॥ सुतेसी वदे सुमंदस्मिता॥१॥ सत्य सर्वगत.

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

सत्य०॥ ॥ जाले पति दर्शना स्कुजाले तूंहि त्व-
रित निजजना॥ पहाया येइं करुनि पूजना॥ या
परि बोलुनि जवें निघाली लीलावति अंगना॥-
जलधितटिं भेटतसे सज्जना॥ चाल॥ कन्यका
समुत्सुक करुनि सत्यपूजा॥ टाकुनि प्रसाद
ग्रहण मुख्य काजा॥ चालली स्वपतिदर्शनीं ध-
रुनि चोजा॥ प०॥ सिंधुतटीं येतांचि बुडाली-
पतिसह धनपूरिता॥ नाव मग पडला उद्यम रि-
ता॥२॥ सत्य०॥ जामात्यासह नाव तीर-जळिं बु
डतां चिंतान्विता॥ स्कु दुःखित होती मातापिता॥
कलावती अतिविकला हृदयीं होउनि तें मूर्छिता॥
पडे कीं धरणीवर अवचिता॥ चाल॥ सज्जनें वि-
लोकुनि मनीं नवल केलें॥ तरिवाहक सकलहि
चिंताकुल ठेले, कन्यकेसि पाहुनि सती पतिसि-
बोले, नावेसह अजि कसा बुडाला कुपित कवण
देवता॥ नकळे ईशचरित तत्वतां॥३॥ सत्य स
र्वगत०॥ ८॥

पद. (रा. नट.)

सांगा मम पति कोणिकडे गेला॥ तीरीं कसाहो-

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

बुडला ॥ ध्रु० ॥ होय उशिर मज येथ यावया ॥-
काय म्हणुनि रागेला ॥ १ ॥ सांगा० ॥ पतिसंगम-
पीयूष कवळ अजि, अधरांतुनि कीं पडला ॥ २
सांगा० ॥ पति-कामें प्रभु पूजन करितां ॥ योग
कसाहा घडला ॥ ३ ॥ सांगा० ॥ करुनि विलाप-
स्मरें कमलापति, कलावती अतिविकला ॥
॥ ४ ॥ सांगा० ॥ ९ ॥

पद० (बाकाय घालिशी० याचा०)

तैं शोक आवरुनि दुहिता मग बोले ॥ अयि व्यर्थ रड
नि नचि फिरते जें घडलें ॥ मी करित्यें अनुगमनासि
म्हणुनि चाले ॥ तें पाहुनि सर्वही शोकाकुल झाले
॥ चा० ॥ मग साधु म्हणे ही हरि-चीच माया ॥ मज भ्रम
वीनसकचे कांहीं शमाया ॥ मी करितों व्रत तें दुरिता-
क्षमाया ॥ हें करुनि दंडवत वदतां आकाशीं ॥ तो दीनद
यालू साधुसि आश्वासी ॥ १ ॥ प्रभु सत्यदेव हा चालक वि
श्वासी ॥ सुखसिंधु पावनो भजतां विश्वासी ॥ ध्रु० ॥ तैं द-
याघन प्रभु गगनिं शब्द बोले ॥ मत्प्रसाद सेवन-
तव कन्ये त्यजिलें ॥ हें म्हणुनि धवासह धनहि-
नष्ट झालें ॥ तें प्रसाद सेवनि सुलभ असें वहि-

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

लें॥ चाल॥ ऐकूनि असें ये तनया गृहालें॥ हरि प्रसाद सेवन करिते स्वहातें॥ मग फिरुनि जलधितटिं येतां पहाते॥ प०॥ तंव सधन कांत तीनाव तटापाशीं॥ पाहुनि त्यजी मग सगळ्या तापासी॥ २॥ प्रभुसत्य देवहा०॥ सुखसिंधु०॥ तैं कोमल वचनें कलावती जनका॥ बोलली विलंबावरि व्रत नेउं नका॥ मग तुष्ट साधुमनिं, पूजि जगज्जनका॥ त्या तटिंच जनासह वेंचुनि धन कनका॥ चाल॥ बहु हर्ष जाहला सकळा जनातें॥ ये बंधुसहित मग साधु पुरीतें॥ प्रतिपर्व-संक्रमणिं करिया व्रतातें॥ जगिं भोगुनि इहसुख पावे सत्यासी॥ तो वागे अंतरिं प्रति श्वासोच्छ्वासीं॥ ३॥ प्रभुसत्य देवहा० ॥ सुखसिंधु०॥ ॥ ॥

इतीश्रीसंगीतसत्यनारायणे चतुर्थः॥ ४॥

## अथपंचमः

### अंजनीगीतें.

यापरि राजा अंगध्वज ही॥ पूर्वी प्रसाद त्यागुनि काहीं॥ पडला तत्क्षणिं दुःख प्रवाहीं॥ सु-

तम्हणे मुनित्तें॥१॥ परिसा त्याचें चरित्र सा-
रें॥ कथितो मी निजमत्यनुसारें॥ मृगया क-
रितां वनसंचारें॥ शिणला नरपाळ॥२॥ येउ-
नि एके वटमूलासीं॥ बैसे तेथें भूप विला-
सी॥ पाहे मग त्या गोपालांसीं॥ करितां विभु-
पूजा॥३॥

पद-(हरि हरि यांहि० चा०)

सुखघन हा दयाघन हा सनातन पदनत-सं-
कटहंता॥ यासि विमुख जन ते अघभाजन,
न धरा येथ अहंता॥ ध्रु०॥ ॥पशुप करिति
हरिपूजन भावें, भूपति निरखि स्वभावें॥ न-
करि नमन नच जाय तयावरि भ्रमला उन्मद
भावें॥१॥ पूजन होतां गोप नृपातें आणुनि दे-
ति प्रसादा॥ परि तो न स्वीकरी दुर्भगत्या-
चाले करुनि प्रमादा॥२॥ सुखघन०॥ पथिं-
च कळे शत पुत्र घात, धन नाश तदा मनिं-
मानी॥ सारा ईशपदिं, सत्य रोष हा घडला-
मज अभिमानी॥३॥ सुखघन०॥ पुनरपि ये-
उनि गोप पदासी पूजी सत्य पदासी॥ प्रसाद-

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

सेवुनि धन तनयान्वित पावे ईशपदासी॥ ४॥
सुखघनहा०॥ ॥ ॥

पद -(गेलामानसांवरा०-चा०)

प्रणत काम पारिजात सत्यदेव हा॥ सूत वदे-
मुनिजनांसि प्रत्यया पहा॥ ध्रु०॥ ॥ भूत द-
ये नारदासि खेद वाटला॥ म्हणुनि त्वरित वि-
ष्णुपुरीं हरिसि भेटला॥ तेधवां स्वसाधवास्य प-
थीं प्रगटला॥ पूर्ण करी तूर्ण काम, चूर्ण करु-
नि दुःखग्राम, सत्य ईश कुशल धाम, हृदयिं तो
वहा॥ १॥ प्रणत काम०॥ सूत०॥ वृद्धरूप धरु
नि हरी विप्रदुःख हा॥ शूद्रदैन्य हरुनि करी
सधन या महीं॥ सज्जनांसि बंधमुक्त करुनि-
ने गृहींतगोपगणासह नृपास, आत्मनिकट देइ
वास, शरण जनीं पुरवि आस, नुरवि पापहा॥ २॥
प्रणत०॥ सत्य व्रत करिल तया सत्य सर्वदा॥
टळुनि सकळ दुःखभयें मिळति संपदा॥ -
म्हणुनि सतत हृदयिं धरा विमळ तत्पदा॥
चाल॥ कोणि यास म्हणति सत्य, कितिक-
ईश काळ नित्य॥ नारायण हाचि सत्य बहुप-

री बहा ॥३॥ प्रणत०॥ सत्य व्रत रूप धरी कलि युगीं हरी ॥ सत्य स्वरूप सुगम नसे इतर यापरी ॥ पाप ताप सकळ दैन्य तत्क्षणीं हरी ॥ चाल ॥ कवि वामन नाममात्र ॥ गोविंदचि वरू मात्र ॥ स्मरत असूं दिवस रात्र पद सरोरुहा ॥ ४॥ प्रणत०॥ ॥ ॥

श्लोक. (शालिनी वृ०)

संगीत श्रीसत्य नारायणातें ॥ ऐके भावें वाचि पारायणातें ॥ श्रद्धा आतां गाय हो सत्य लोका ॥ सोपा आपा यत्न हा सत्य लोकां ॥ १॥ काया-वाचा-मानसीं कीं स्वभावें ॥ जें जें केलें स्क-ष्टकीं दुष्टभावें ॥ त्या त्या कर्मां ही सर्व सत्य पायीं ॥ संगीतोक्ती अर्पिली हे उपायीं ॥ २॥ ॥

इति पंचमोंशः

इति श्रीसंगीत सत्य नारायण संपूर्ण ॥ ❧

आरती.

जय जय जय सत्यात्मन् जय कमलाजाने ॥ नारायण नालं तव विधिरपि गुण गाने ॥ ज० ध्रु०॥ दीनो विजविहीनः पर्यटन श्रांतः दृष्ट्वा सपदि भवन्मुखश-

A joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

शिनाविश्रांतः॥ वयसैव वृथतांयो भगवन्संयात्तः॥
विप्रः सोद्य धनैस्तां यशसापिचनीतः॥१॥ क्रेता-
काष्ठानांसतुजेता काष्ठानां॥ कर्त्ता पूर्वमिदानींह-
र्त्ता कष्टानां॥ फलमिदमीश्वर भवता कृपया दृष्टा-
नां॥ त्राता त्वमेव जगतां कृतांतदृष्टानां॥२॥जय०॥
अंगध्वजभंगविपाद्‌हृद्दर्पोभग्नः॥ साधुरसाधुमे-
नस्त्वाद्व्यञ्जलधौमग्नः॥ स्मर्तातवसुखपात्रवि
स्मर्त्तोद्विग्नः॥ स्यादिति वामनहृदलि स्त्वयिस-
ततंलग्नः॥३॥ जयजय०॥ ॥ ॥

# समाप्तः

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

समाप्त.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com